N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0042 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/02/2026 19:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 27/01/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/02/2026
**Time From (वेळेपासून):** 18:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/02/2026 **Time (वेळ):** 19:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 022
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2026 19:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सार्वजनिक बांधकाम विभाग,कार्यालय ,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यशवंत विश्वानाथ बोरसे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन दत्तात्रंय इंगळे | | | 1. 36,स्टेशन रोड ,स्नेह नगर , धुळे ,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 1600 अचलनी नोटा | 800,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):
800,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यापासुन कार्यरत आहोत. दि.27.01.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार हेमराज भरतसिंग गिरासे यांची नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभागातील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास आदेशित केल्याने आम्ही मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभाग, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी गौरव रमेश भामरे, कनिष्ठ लिपीक व मयुर मधुकर सोनवणे, सहायक कृषी अधिकारी यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार हेमराज भरतसिंग गिरासे व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव हेमराज भरतसिंग गिरासे, वय 41 वर्ष, व्यवसाय- शासकीय ठेकेदार, मेसर्स एच.बी. इलेक्ट्रीकल्स, धुळे, रा.प्लॉट नं. 49, हरचंद नगर, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आली ती ''मी शासकीय विद्युत ठेकेदार असुन माझी मेसर्स एच. बी. इलेक्ट्रीकल्स, धुळे या नावाने फर्म आहे. सदर फर्मच्या नावाने शासनाचे विद्युत कामांचे ठेके घेवुन काम करतो. मी धुळे विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे अंतर्गत नंदुरबार जिल्हयातील धडगांव या तालुक्यातील 28 गावात/पाड्यात एल.ई.डी. सोलर स्ट्रीट लाईट बसविण्याचे प्रत्येकी 8,49,477/- रुपयांचे एकुण जी.एस.टी. वगळता 2,37,29,356/- रुपयांची माझी निविदा मंजुर होवुन मला सदर कामांची वर्क ऑर्डर मिळाली होती. सदरची कामे मी मुदतीमध्ये पुर्ण केली असुन त्यांचे बिले मला अदा करण्यात आलेली आहेत. सदर बिलांपैकी मला जी.एस.टी. सह शासकीय कपाती वजा जाता सुमारे 41,00,000/- रुपये मार्च-2025 मध्ये अदा करण्यात आले आहेत. तेव्हा सदर बिल अदा करण्याच्या मोबदल्यात नितीन इंगळे, उप अभियंता, विद्युत उप विभाग, सा.बा. विभाग, नंदुरबार यांनी माझेकडुन 80,000/- रुपये लाचेची रक्कम घेवुन उर्वरीत 30,000/- रुपये पुढील बिल अदा केल्यानंतर दयावे लागतील असे सांगितले होते. त्यानंतर मी केलेल्या कामांचे उर्वरीत 2,02,05,525/- रुपयांचे बिल मला माझ्या फर्मच्या बँक खात्यात डिसेंबर-2025 मध्ये अदा करण्यात आले आहेत.

त्यानंतर मी सदर कामांव्यतीरिक्त ठेका घेतलेल्या एल.ई.डी. सोलर स्ट्रीट लाईट बसविण्याच्या कामां संदर्भात विद्युत उप विभाग, सा.बा. विभाग, नंदुरबार या कार्यालयात सुमारे 7/8 दिवसापुर्वी गेलो असता तेथे नितीन इंगळे, उप अभियंता यांचेशी माझी भेट झाली. तेव्हा त्यांनी मला ''तुम्हांला 2,02,05,525/- रुपये अदा केलेल्या कामांच्या बिलाच्या व मागील अदा केलेल्या सुमारे 41,00,000/- रुपयांच्या कामांच्या बिलांच्या मोबदल्यात एकुण 8,50,000/- रुपये दयावे लागतील नाहीतर तुझे पुढील कामांचे बिलांवर मी सहया करणार नाही.'' असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी उप अभियंता नितीन इंगळे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे कार्यालयात उप अभियंता नितीन इंगळे यांची भेट घेण्यासाठी पंच नं. 01 गौरव भामरे यांचेसह पायी रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच गौरव भामरे असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 भामरे यांना विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार व उप अभियंता इंगळे यांच्यात तक्रारदार यांनी केलेल्या कामे व बिलांबाबत चर्चा होवुन तक्रारदार यांना यापुर्वी सांगितलेल्या 1,10,000/- रुपयांपैकी 80,000/- रुपये दिले

असुन त्यातील 30,000/- रुपये बाकी आहेत ते व आताच्या दोन कोटीच्या बिलाचे 8,20,000/- रुपये असे एकुण 8,50,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा त्यांच्यात तडजोड होवुन इंगळे साहेबांनी राउंड फिगर 8,00,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. तेव्हा तक्रारदार यांनी परवाला करुन देतो असे सांगितले असता इंगळे साहेबांनी फोन करुन येण्याची जागा सांगेल असे सांगितल्याची हकिगत कथन केली. सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित झालेल्या संभाषणाची एेकुन खात्री करण्यात आली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.दरम्यान पडताळणी कार्यवाही मधील दोन्ही पंचांंचे त्यांच्या कार्यालयामार्फत पुणे येथे प्रशिक्षण असल्याने त्यांना दि.29.01.2026 रोजी कार्यमुक्त करुन सदर पंचांएेवजी प्रणय बनसोड, व धनराज पाटील यांना उपलब्ध करुन घेतले. अभियंता नितीन इंगळे यांनी तक्रारदार यांना आज रोजी पैसे घेवुन येण्याबाबत फोन करुन कळविले असल्याने आम्ही आज रोजी सापळा आयोजित केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे सापळा कारवाईकामी पैसे नसल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात उपलब्ध असलेल्या अचलनीय नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 500/- रुपये दराच्या 1600 असे 8,00,000/- रुपयांच्या अचलनीय नोटा काढुन सदर अचलनीय नोटांचे 16 बंडलांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याजवळील कापडी पिशवीमध्ये ठेवुन ती पिशवी तक्रारदार यांनी त्यांच्या बॅगमध्ये ठेवुन घेतली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 प्रणय बनसोड अशांना पायी धुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 धनराज पाटील, पोहेकॉ. राजन कदम, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. प्रविण पाटील यांचेसह खाजगी वाहन क्रमांक एम.एच.01 डीपी 1478 ने व मोटार सायकलींनी जावुन धुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयासमोरील रस्त्यालगत वाहने थांबवुन कार्यालयाचे आवारात व आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी "मी व तक्रारदार पायी चालत या कार्यालयात आलो. तेथे इंगळे साहेब दिसुन न आल्याने तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईल वरुन इंगळे साहेबांना फोन केला. तेव्हा इंगळे साहेबांनी ते हॉस्पीटलमध्ये आले आहेत. पाच मिनिटात येतो असे तक्रारदार यांना सांगितले. काही वेळाने इंगळे साहेब येवुन कार्यालयातील लेखाधिकारी यांच्या छोटया पार्टिशन कक्षात बसले. तेव्हा तक्रारदार हे इंगळे साहेबांना भेटण्यास कक्षात गेले. तेव्हा मी कक्षाच्या पार्टिशन जवळ थांबुन होतो. तेव्हा तक्रारदार व इंगळे साहेब यांच्यात चर्चा झाली. तेव्हा इंगळे साहेबांनी हाताच्या इशाऱ्याने पैशांबाबत खुणविले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या बॅगमधील लाचेची रक्कम ठेवलेली पिशवी बाहेर काढुन इंगळे साहेबांसमोर टेबलावर ठेवुन पैसे पुर्ण आठ आहेत असे सांगितले. तेव्हा इंगळे साहेबांनी पैसे लावले आहेत का? अशी विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी हो असे सांगितले. दरम्यान इंगळे साहेबांनी लाचेची रक्कम ठेवलेल्या पिशवीतील नोटांचे बंडल मोजून ते 8,00,000/- रुपये असल्याची खात्री करुन चला गाडीत, हे तुमच्या जवळ ठेवा, गाडीत बसु असे तक्रारदार यांना सांगुन इंगळे साहेब स्वच्छतागृहाकडे गेले. तेव्हा तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला." अशी हकिगत सांगितली. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोहेकॉ. राजन कदम यांनी स्वच्छतागृहाकडुन कक्षाकडे येत असलेले इंगळे यांना ताब्यात घेवुन सदर पार्टिशन कक्षात आणले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच नं. 2 धनराज पाटील यांनी सदर कक्षातील टेबलावरील लाचेच्या रकमेची कापडी पिशवी ताब्यात घेवुन त्यामधील लाचेच्या रकमेची खात्री केली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशा प्रकारे नितीन दत्तात्रय इंगळे, वय 53 वर्षे, उप अभियंता, विद्युत उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी तक्रारदार हेमराज भरतसिंग गिरासे यांनी ठेका घेतलेल्या विद्युत कामांचे अदा केलेल्या बिलांच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे दि.27.01.2026 रोजी पंचासमक्ष तडजोडीअंती 8,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते. त्यानंतर आज दि.09.02.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान नितीन इंगळे, उप अभियंता यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन धुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयात 13:43 वाजता 8,00,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dipak dagadu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन